| *आदिवासी विकास विभाग* | | | | |
|---|---|---|---|---|
| **१०० दिवस कार्यक्रमाची सद्य:स्थिती दर्शक माहिती (दि.१०.११.२०२५ अखेर)** | | | | |
| **अ. क्र.** | **मुद्दा** | **कार्यवाही पूर्ण/अपूर्ण** | **पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो/इ. अभिलेख किंवा त्याची लिंक** | **अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा** |
| १ | राज्यात आदर्श आदिवासी गाव योजना राबविणे | **कार्यवाही पूर्ण** | अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी बहुल गावांच्या सर्वांगीण विकासासाठी "आदर्श आदिवासी गाव" योजना राबविण्याबाबत दि. २८.३.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. | |
| २ | आदिवासी विभागामार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या पुरस्कारांचे नामांतर करणे. | **कार्यवाही पूर्ण** | दि. १६.१.२०२५ रोजी शासन निर्णयान्वये "आदिवासी सेवक पुरस्कार" व "आदिवासी सेवा संस्था पुरस्कार" यांचे नाव अनुक्रमे "भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण पुरस्कार" व "भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण संस्था पुरस्कार" असे नामांतर करण्यात आले आहे. | |
| ३ | आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेला स्वायत्तता | **कार्यवाही पूर्ण** | TRTI ला स्वायतत्ता देण्यात आलेली असून त्यानुसार ५० कोटी रुपये ठोक स्वरुपात सन २०२५-२६ साठी तरतूद करण्यात आलेली आहे. | |
| ४ | वन हक्क कायद्याअंतर्गत डेटा एंट्री पूर्ण करणे आणि सर्व दाव्यांचे डिजिटायझेशन करण्यासाठी सर्व दाव्यांचे स्कॅनिंग करणे. | **कार्यवाही पूर्ण** | सद्य:स्थितीत राज्यात ग्रामसभा स्तरावर एकूण ३,९८,७७३ दावे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी जिल्हासमितीवर २,००,९१९ दावे मान्य करण्यात आले आहेत. तसेच ८५,५८५ दावे अमान्य करण्यात आले व २१,६६९ दावे निर्णयावर प्रलंबित आहेत. सदर दाव्यांचे आदिवनमित्र या ऑनलाईन प्रणालीवर डेटाएन्ट्रीचे व स्कॅनिंगचे कामकाज पूर्ण करण्यात आले आहे. | |
| ५ | आश्रम शाळेमध्ये परिचारीकांची नियुक्ती करणे | **कार्यवाही पूर्ण** | निविदा प्रक्रीया पुर्ण झाली असून दि. १८.३.२०२५ अन्वये शासनाची वित्तिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. कार्यारंभ आदेश दि. २९.३.२०२५ रोजी देण्यात आलेले आहेत. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | गट "क" पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करणे, ज्यात एकूण १७ संवर्ग यांचा समावेश आहे | **कार्यवाही पूर्ण** | १) उच्च श्रेणी लघुलेखक ०३ पदे, निम्न श्रेणी लघुलेखक १४ पदे व लघुटंकलेखक १० पदे या पदाची परीक्षा १६.१.२०२५ रोजी घेण्यात आली आहे. २) ग्रंथपाल (४८) पदे, प्रयोगशाळा सहाय्यक (३०) पदे, सहाय्यक ग्रंथपाल (१) पद, कॅमेरामॅन प्रोजेक्टर ऑपरेटर, कम (१) पद, या पदांची परीक्षा दिनांक २४.१.२०२५ रोजी घेण्यात आलेली आहे. ३) उर्वरित संवर्गातील सर्व पदांच्या परीक्षा दि. ९ एप्रिल, २०२५ ते दि. २५ एप्रिल, २०२५ या कालावधीत घेण्यात आल्या आहेत. | |
| ७ | अप्पर आयुक्त पदांचे तसेच इतर गट अ, ब, व क संवर्गातील पदांचे सेवा प्रवेश नियमांमध्ये सुधारणा करणे (एकूण १९ संवर्ग) | कार्यवाही अपूर्ण | | सुधारीत सेवाप्रवेश नियम तयार करण्यासाठी नस्ती सामान्य प्रशासन विभागास दि. १७.४.२०२५ रोजी सादर करण्यात आली होती. सामान्य प्रशासन विभागाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करुन नस्ती सामान्य प्रशासन विभादास फेरसादर करण्यात आली आहे. त्यानंतर विधी व न्याय विभाग, MPSC यांचे अभिप्रायानंतर मा. मुख्यमंत्री यांचे मान्यतेने मा. राज्यपाल महोदय यांचेकडे पाठविण्यात येईल. कार्यवाही पूर्ण होण्यास किमान तीन महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. |
| ८ | ई -निरीक्षक प्रणालीच्या माध्यमातून शाळांची मॉनिटरिंग करणे | **कार्यवाही पूर्ण** | १) ई-निरक्षण ॲप सुरु करण्यात आलेला आहे. २) ४९७ शासकीय व ५५३ अनुदानित आश्रम शाळा व ३७ EMRS समाविष्ठ झालेल्या आहे. ३) ४९७ शासकीय आश्रम शाळां, ५५३ अनुदानित आश्रम शाळा व ३७ EMRS शाळांचे मॅपींग झालेले आहे. त्यापैकी अनुक्रमे ४९५, ४९५ व २९ शाळांना भेट दिलेली आहे. ४) ई- निरिक्षण ॲपवर भेट दिलेल्या शाळांपैकी डिसप्ले होणा-या ४९५ आश्रम शाळा, ५५४ अनुदानित आश्रम शाळा व २९ EMRS शाळा आहेत. सर्व शाळांची अद्ययावत माहिती online उपलब्ध करण्यात आली आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | आदिवासी विभागासाठी कृतीं आराखडा तयार करणे | **कार्यवाही पूर्ण** | आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विकास योजना, आश्रम शाळा व EMRS वार्षिक नियोजन, नामांकित शाळा कालबध्द कार्यक्रम, विद्यार्थांना देय सोयीसुविधा, प्रशासकीय बाबी, प्रशिक्षण इत्यादी बाबतचा कार्यालय निहाय वार्षिक कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला आहे. दिनांक ७ व ८ एप्रिल, २०२५ रोजीच्या प्रकल्प अधिकारी कार्यशाळेत वार्षिक नियोजन पुस्तिका प्रसिध्द करण्यात आली. | |
| १० | सर्व शाळांमध्ये संविधान दिवस राबवणे | **कार्यवाही पूर्ण** | १) ४९७ आश्रम शाळा व ५५३ अनुदानित आश्रम शाळांमध्ये संविधान दिन व संविधान पंधरवडा साजरा करण्याबाबत वार्षिक वेळापत्रक निश्चित केले आहे. २) प्रत्येक आश्रम शाळा व वसतीगृहामध्ये यापुढे दरवर्षी संविधान पंधरवडा व संविधान दिन साजरा करण्यात येईल. | |
| ११ | राज्यातील विद्यापीठाच्या आवारामध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता वस्तीगृह बांधण्यासंदर्भात कार्यवाही करणे. | **कार्यवाही पूर्ण** | शासनाने मार्च महिन्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सन २०२५-२६ च्या बजेट बुकमध्ये कोणत्याही नविन कामास मान्यता देण्यात येणार नाही, असा निर्णय घेतला होता. त्यामुळे सदर बाब वार्षिक कृती आराखडयात समाविष्ट करण्यात आली आहे. | |
| १२ | शासकीय आश्रमशाळेमध्ये ७३ नमो विज्ञान केंद्र स्थापन करणे. | **कार्यवाही पूर्ण** | शासकीय आश्रम शाळांमध्ये ७३ नमो विज्ञान केंद्र स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले असून सर्व ७३ शाळांसाठी वर्क ऑडर दिलेली आहे. | |
| १३ | राज्यात १२१ आदर्श आश्रमशाळा तयार करणे. | **कार्यवाही पूर्ण** | १२१ आदर्श आश्रम शाळांमध्ये डिजिटल क्लासरुम, व्हर्च्युअल क्लासरुम, टॅब लॅब, स्टुडिओ, फेसिअल बायोमॅट्रिक इत्यादी अत्याधुनिक डिजिटल शैक्षणिक सोयी- सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने पुरवठादार संस्थाना संपुर्ण पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. उपरोक्त १२१ आश्रम शाळांपैकी ३० शाळांमध्ये सुविधावाढ करण्याच्या दृष्टीने नविन क्लासरुम बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देखिल देण्यात आली असून वर्क ऑर्डर देखिल देण्यात आली आहे. १८ आश्रम शाळांचे सुविधावाढीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | नामांकित शाळांचे त्रयस्त यंत्रणेमार्फत मुल्यांकन- | **कार्यवाही पूर्ण** | नामांकित शाळांचे टाटा इंस्टिट्युट ऑफ सोशल सायन्स, मुंबई, सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, मुंबई विद्यापीठ, मुंबई इ. संस्थामार्फत Third Party Audit करणेबाबत प्रस्ताव दि. २३.१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन टाटा इंस्टिट्युट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांनी प्रस्ताव सादर केला असून त्यास मान्यता देण्यात आली आहे. शाळांचे मुल्यांकन शाळा सुरु झाल्यावर जून-जुलै महिन्यात करण्यात येणार आहे. | |
| १५ | नंदुरबार जिल्ह्यात २०२२-२३ चा बेंचमार्क सर्वेक्षण पूर्ण करणे | **कार्यवाही पूर्ण** | १) बेंचमार्क सर्वेक्षणासाठी ई- निविदा प्रक्रीयेद्वारे AFC LTD, नागपूर या बाह्यस्थ संस्थेची निवड करण्यात आली आहे. यासाठी रुपये २८०.८४ लक्ष प्राप्त असून यापैकी रुपये १४०.४२ लक्ष खर्च (५० टक्के) असून उर्वरित ५० टक्के निधी डेटा व अहवालास मान्यता दिल्यानंतर अदा करणे प्रस्तावित आहे.<br>२) ऑनलाईन माहिती संकलणासाठी "आस( ASS) नावाचे मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे दिनांक २१.८.२०२३ पासून प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले.<br>३) सप्टेंबर २०२४ अखेर एकूण ४,५२,००२ कुटुंबाचे सर्वेक्षण पुर्ण झाले आहे. सर्व माहितीच्या पुर्नतपासणीचे काम पुर्ण झालेले आहे. त्याबाबतचा प्रारूप अहवाल प्राप्त आहे. | |
| १६ | अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षणाच्या गरजा ओळखून प्रशिक्षणाचा आराखडा तयार करणे. | **कार्यवाही पूर्ण** | अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षणाच्या गरजा ओळखून प्रशिक्षण घेणे यासाठीच्या आराखडा तयार करण्यात आलेला असून सन २०२५-२६ या वित्तीय वर्षामध्ये अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | वर्ग “क” कर्मचाऱ्यांसाठी पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम करणे. | **कार्यवाही पूर्ण** | आदिवासी विकास विभागातील एकूण कार्यरत २१ संवर्गासाठी ४ प्रकारचे प्रशिक्ष घेण्यात येणार असून त्यासाठीच्या प्रशिक्षणार्थिंची संख्या ७,४६० इतकी आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम माहे एप्रिल-२०२५ ते माहे मार्च-२०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. त्यासाठीचे प्रशिक्षण मोड्यूल तयार करण्यात आले आहे. | |
| १८ | यूपीएससी, एमपीएससी, एमपीएससी अभियांत्रिकी आणि कायदा सेवा, आयबीपीएस, एसएससी, पीएसआय एसटीआय, टीईटी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना | **कार्यवाही पूर्ण** | १) युपीएससी दिल्ली, युपीएससी महाराष्ट्र, एम.पी. एस.सी. राज्यसेवा, एमपीएससी अभियांत्रिकी व विधी स्पर्धा परिक्षा कार्यक्रम पुर्व प्रशिक्षण योजना एकूण कालावधी ११ महिने असून प्रशिक्षण वर्ग सुरु झालेले असून प्रशिक्षण साडे तीन महिना पुर्ण झालेले आहे. २) एम.पी.एस.सी.- गट क, पीएसआय, सहा. कक्ष अधिकारी, टीईटी, एसएससी, आयबीपीएस, परीक्षा पुर्व प्रशिक्षण योजना एकूण कालावधी सहा महीने असून प्रशिक्षण वर्ग सुरु होऊन साडे तीन महीने पुर्ण झालेले आहे. ३) प्रशिक्षणार्थिना डि.बि.टी. अदा करण्यात आलेली आहे. | |
| १९ | १६ आदिवासी बोली भाषे मध्ये १० आरोग्य विषयक स्पोकन ट्युटोरियल तयार करणे. | **कार्यवाही पूर्ण** | १६ भाषाच्या प्रत्येकी १० ट्युटोरियलचे भाषांतरचे काम पुर्ण झाले असून ३ भाषांचे प्रत्येकी १० ऑडीओ रेकॉर्डिंग पुर्ण झाले आहे. डबिंगचे काम सुरु आहे. | |
| २० | पोलिस सैन्य आणि निमलष्करी शारीरिक प्रशिक्षण योजना | **कार्यवाही पूर्ण** | पोलीस सैन्य आणि निमलष्करी शारीरीक प्रशिक्षण योजना कालावधी ६ महीने असून प्रशिक्षण वर्ग सुरु झालेले आहेत. प्रशिक्षणास तीन महिने पुर्ण झालेले आहेत. डी.बि.टी अदा करण्यात आलेली आहे. | |
| २१ | GRE, TOEFL आणि परदेशी भाषा प्रशिक्षण योजना | **कार्यवाही पूर्ण** | सदर योजना राज्यात प्रथमतःच राबविण्यात येत आहे. TRTI मार्फत प्रशिक्षण संस्थेच्या निवडीसाठी दि. ०४.०२.२०२५ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असून प्रशिक्षण संस्था निवडीबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु आहे. | |
| २२ | आदिवासी विकास विभांगांतर्गत रोजगाराभिमुख | **कार्यवाही पूर्ण** | रोजगारभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम (एकलव्य कुशल) योजनेअंतर्गत २००० युवक- युवतींना | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम (एकलव्य कुशल). | | विविध रोजगारभिमुख कौशल्य प्रशिक्षणाचे उद्दिष्टे ठेवण्यात आले होते. त्यानुसार २३५० लाभार्थीचे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. | |
| २३ | माहिती अधिकाराची प्रबळरित्या अंमलबजावणी करिता सुटसुटीत तसेच वापरण्यास अनुकूल वेबसाइट तयार करणे. | **कार्यवाही पूर्ण** | विभागाच्या वेबसाईटची निर्मिती करण्यात आली आहे. https:// tribal.maharashtra.gov.in | |
| २४ | आयुक्त कार्यालयात ई-ऑफिस प्रणाली सुरू करणे | **कार्यवाही पूर्ण** | आयुक्त कार्यालयात दिनांक १.२.२०२५ पासून ई ऑफीस प्रणाली सुरु करण्यात आली आहे. | |
| २५ | विभागाचे संकेतस्थळ अद्यावत करणे व माहिती अधिकार अंतर्गत नमूद सर्व माहिती संकेतस्थळावर नागरिकांना उपलब्ध करून देणे | **कार्यवाही पूर्ण** | www.mahatribal.gov.in विभागाचे संकेतस्थळ तयार करण्यात आले असून सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. | |
| २६ | आदिवासी घटक कार्यक्रमाचे संगणकीकरण करणे (ipass software) | **कार्यवाही पूर्ण** | आदिवासी घटक कार्यक्रमाचे संगणकीकरण करणे (ipass software) प्रणालीसाठी दि. २९ एप्रिल, २०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. | |
| २७ | FPO योजने अंतर्गत ४० शेतकरी अत्पादक कंपन्या / गट यांनी सादर केलेल्या प्रस्तांवाना मान्यता देणे. | **कार्यवाही पूर्ण** | FPO योजनेतंर्गत ४० शेतकरी उत्पादक कंपन्या/ गट यांनी सादर केलेल्या प्रस्तावांपैकी ४० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. | |
| २८ | शबरी महामंडळांतर्गत FPO/वनधन केंद्र यांचेकडून उत्पादीत होणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करणेकामी शबरी नॅचरल्स या नावाने बँड तयार करण्यांत आला असुन त्याकरीता FPC स्थापन करणे. | **कार्यवाही पूर्ण** | आदिशबरी फाउंडेशन या नावाने फेडरेशन स्थापन करुन दि. ०२/०४/२०२५ रोजी रजिस्ट्रार ऑफ कंपनीकडे (ROC) अर्ज सादर केला आहे. आदिवासी FPO यांनी तयार केलेली उत्पादने विक्रिसाठी ww.shabarinaturals.com नावाचे ई-कॉमर्स पोर्टल सुरु करण्यात आले आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | आदिपर्यटन योजनेंतर्गत ग्रामस्तरीय आदिवासी पर्यटन समित्या सक्रिय / तयार करणे. | **कार्यवाही पूर्ण** | शबरी आदिपर्यटन योजनेंतर्गत २५ गावातील ग्राम पर्यटन समित्या तयार करण्यात आलेल्या आहेत. | |
| ३० | वॉशमित्र कार्यक्रमा अंतर्गत महिलांना विविध व्यासायिक प्रशिक्षण देणे. (electricals, plumbing, etc). | **कार्यवाही पूर्ण** | वॉशमित्र/आदिसखी या नाविण्यपुर्ण उपक्रमांतर्गत ५० आदिवासी महिला व युवतींना युनिसेफ मार्फत प्रशिक्षण देण्यात आले असून १२० आदिसखी प्रशिक्षणाकरीता रुपये ३४ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. सी. वाय. डी. संस्था पुणे यांनी एकूण ३८ टुल कीट वाटप केले आहे. | |
| ३१ | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना व राज्य शासन पुरस्कृत कर्ज योजना | **कार्यवाही पूर्ण** | ७३७ इच्छुक उमेदवारांचे कर्ज प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. | |
| ३२ | लाभार्थ्यांकरिता राज्यातील प्रत्येक कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ माहिती केंद्र स्थापन करणे | **कार्यवाही पूर्ण** | राज्यातील ३२ कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ “माहिती सुविधा केंद्र” सुरु करण्यात आली आहेत. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | १५० व्या बिरसा मुंडा जयंती च्या अनुषंगाने राज्यामध्ये विविध कार्यक्रमांचे नियोजन करणे- | **कार्यवाही पूर्ण** | १) दिनांक १५.११.२०२४ ते १५.११.२०२५ पर्यंत आयोजित करण्यात येणा-या विविध उपक्रमांचे कॅलेंडर तयार करण्यात आले. २) "महाराष्ट्रीय आदिवासी आदिम संस्कुतीचा समृध्द वारसा" हे संग्रह पुस्तक (कॉफी टेबल बुक) दि. २६.१.२०२५ रोजी प्रकाशित करण्यात आले आहे. ३) माहे मे मध्ये "Tribal Youth Entrepreneurship Summit" हा राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रम पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. ४) नागपुर येथे राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतीक महोत्सव आयोजित करणेबाबत नियोजन करण्यात आले असून सदर कार्यक्रम जागतिक आदिवासी दिन ९ ऑगस्ट २०२५ रोजी करण्याचे प्रस्तावित आहे. ५) अनुसुचित जमातीमधील थोर क्रांतिकारक यांचे जयंती व पुण्यतिथी निमित्त त्यांचे जन्म ठिकाणी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करणे प्रस्तावित आहे. वरिलप्रमाणे विविध कार्यक्रमांचे वार्षिक नियोजन पुर्ण करण्यात आले आहे. | |
| ३४ | शैक्षणिक डीबीटी रक्कम विहित वेळेत देणे बाबत | **कार्यवाही पूर्ण** | जानेवारी २०२५ पर्यंत स्वयम् योजनेसाठी ९० कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच शासन आदेश दिनांक २४.२.२०२५अन्वये ३० कोटी, दि. २८.२.२०२५ अन्वये ३० कोटी व दि. २९.३.२०२५ अन्वये ४४ कोटी निधी वितरित करण्यात आला असून विद्यार्थांना डी.बी.टी. वाटप करण्यात आले आहे. | |
| ३५ | आदिवासी उपयोजना पुनर्रचनेचा प्रस्ताव केंद्रस्तरावर पाठविण्यात आला आहे, त्याचा उच्च स्तरावरून पाठपुरवा करणे गरजेचे आहे. | **कार्यवाही पूर्ण** | मा. मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीने मा. केंद्रीय मंत्री जनजातीय कार्य मंत्रालय यांना दिनांक ३.३.२०२५ अन्वये पत्र पाठविण्यात आले आहे. | |

**कार्यासन १४ चे वन हक्क दाव्यासबंधी अभिप्राय :-**

राज्यात एकूण ३,९८,७६१ दावे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी २,००,२६३ दावे मान्य करण्यात आले आहेत. ८२,७६९ दावे अमान्य करण्यात आले व २४,३४८ दावे निर्णयावर प्रलंबित आहेत. एकूण ३,०७,३८० दाव्यांपैकी १,७८,६२९ दाव्यांचे स्कॅनिंग पुर्ण झालेले असून उर्वरित दाव्यांचे स्कनिंग पुढील तीन महिन्यात पुर्ण होईल